**International Research Journal of Human Resource and Social Sciences**
**ISSN(O): (2349-4085) ISSN(P): (2394-4218)**
**Impact Factor 5.414 Volume 5, Issue 7, July 2018**
**Website-** www.aarf.asia, **Email** : editoraarf@gmail.com

# महाभारताचा अन्वयार्थ : व्यासपर्व

**डॉ. भारती खापेकर**
सहयोगी प्राध्यापा व
मराठी विभाग प्रमुख,
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

## प्रास्ताविक

मराठी साहित्यात दुर्गाबाई भागवत यांच्या ललितलेखसंग्रहामधून महाभारतातील व्यक्तिचित्रणाचा वैचारिक अंगाने विचार केला गेला आहे. महाभारतातील व्यक्ती आपल्या संस्कृतीवर ठसा उमटविणाऱ्या आहेत. तसेच महाभारतावर अनेक प्रतिभावंतांनी अनेक प्रकारचे लेखन केले आहे. परंतु दुर्गाबाई भागवतांनी बदलत्या जीवन जाणिवांचा संदर्भ घेऊन व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे.

महाभारत हे भारत देशातील महाकाव्य आहे ज्याची कथा भारत देशात प्राचीन काळापासून सांगितली जाते. महाभारताचे युध्द कुरूक्षेत्रावर लढल्या गेले होते. महाभारतातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. महाभारत या महाकाव्याचे रचियेता वेदव्यास आहेत. या ग्रंथात राजनीती, कुटनीती, व्रत, तीर्थ, सण, धर्मचर्चा, देशाचे आचार – विचार, समाजात स्त्रियांचे स्थान, राजधर्म, उपदेश, विवाह, मित्रता, शत्रुता, इत्यादी अनेक विषय आले आहे. व्यापपर्व मधून कृष्ण, द्रोणाचार्य, अश्वस्थामा, दुर्योधन, कर्ण, अर्जुन, युधिष्टिर, भीष्म, विदूर आणि द्रौपदी या व्यक्तिरेखांचा समावेश केला आहे.

## व्यासपर्व मधील व्यक्तिचित्रण

व्यासपर्व या व्यक्तिचित्रणात्मक लेखातून दुर्गाबाई भागवत व्यास प्रतिभेचा मागोवा घेत महाभारतातील व्यक्तिरेखांच्या अंतरंगात प्रवेश करतात, त्यांच्या सुखदु:खाशी समरस होतात. तसेच महाभारतात आदिपर्व, सभापर्व, उद्योगपर्व, भीष्मपर्व, वनपर्व, अनुशासन, अश्वमोहीक अशी अनेक पर्व आली आहे. परंतु दुर्गाबाईंनी व्यासप्रतिभेच्या आवि  काराला ‘व्यासपर्व’ हे नाव दिले आहे.

**© Associated Asia Research Foundation (AARF)**
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

"संदर्भ शोधनासाठी दुर्गाबाई प्रथम महाभारताकडे वळल्या, मग मनोरंजन एक भावनिक गरज म्हणून महाभारत वाचू लागल्या. त्यातूनच त्यांच्या पिंडानुसार साक्षेपी वाचन सुरू झाले. त्याच्या मनोविश्वाचा ताबा त्यातील काही व्यक्तिनी घेतला. त्या व्यक्ती त्यांच्याशी बोलू लागल्या. व्यक्तिचित्रे व्यासांची पण बाईंच्या नजरेला भावलेली, मनाला भिडलेली व त्यांच्या प्रतिभाचक्षूसमोर साकार झालेली त्यांनी ती व्यासपर्वात सादर केलीत."[१]

दुर्गाबाईंच्या संवेदनशील मनाने व्यक्तिरेखांशी कसा संवाद साधला याचे वर्णन त्यांनी प्रस्तावनेतून केले आहे. "त्यांच्या व्यक्तिगत जीवनात अभ्यासाचे फळ हाती तोंडी आहे होते; पण नेमका सफलसिध्दीचा काळच त्याच्या मनात असमाधानाचा आणि अश्रध्देचा आगडोंब उसळविणारा ठरला. नकळत काही भागांनी त्यांना अस्वस्थ केले. काव्यशासविनोदा पोटी त्यांनी महाभारताच्या वाचनाला सुरूवात केली; परंतु कथानकाच्या आनुषंगाने अनेक प्रश्न निर्माण झाले."[२] या व्यक्तिरेखांशी कशा पध्दतीने संवाद साधला या संदर्भात दुर्गाबाई व्यासपर्वामध्ये लिहितात. "महाभारताच्या एका अंगाने दर्शन हे त्यांच्यातल्या सामर्थ्यपूर्ण व सौदर्यशाली गाभ्याचे संपूर्ण दर्शन नव्हे."[३] तर महाभारतात यौगिक भूमिकेचाही प्रत्यय येतो ज्ञानाचे वैदग्ध्य सहज भासते, मानवीव्यवहाराची जटिलता जाणवते, दैवगतीची वक्रता मनाला थरकवते, कथेचा ओघ प्रवळ आहे याचे भान प्रारंभापासून अखेरपर्यंत क्षणभरही ढळत नाही. हाच महाभारतातील परंतु महाभारताचे सौदर्य त्याच्या या बलावेगातच केवळ नाही या शूक्ष्म सामर्थ्याहूनही एक अतिशूक्ष्म अभेद्य असा कोमलतेचा कंद काव्य छंदाच्या अनुरोधाने कथेच्या लालित्याच्या अनुषंगाने महाभारताच्या कठीण कवचाच्या अंतर्यानात भरून राहिला आहे. भव्य कोरीव मूर्तीच्या तोंडावर जी कोवळ्या मानवी भावांची छटा दिसते तिच कोवळी छटा महाभारताच्या नाट्यपूर्ण अतिविशाल कथेच्या अंगप्रत्यांत भरून राहिली आहे. याचा साक्षात्कार झाला तरच महाभारताच्या कलाकृतीचे भान येण्याचा संभव नाही. अभ्यासकाला भरपूर ओला, कोरडा चारा पूरविणारे एक अनुपम कुरण एवढेच त्याचे उपयोगिक मूल्य ठरते. मग ते मूल्य व्यावहारिक ज्ञानासाठी असो, तत्व निष्कर्षासाठी असो, नीतीच्या पुरस्कारासाठी असो किंवा आध्यात्मिक गरजेसाठी असो."[४] अशा प्रकारचा नवीन विचार दुर्गाबाई मांडतात.

अनेक अभ्यासकांनी अनेक अंगानी महाभारताचा अभ्यास केला. केवळ ज्ञान मिळविणे किंवा आध्यात्मिक गरज म्हणून महाभारताचा विचार होण्यापेक्षा त्यातील नाट्यपूर्ण सोंदर्याचा साक्षात्कार होणे महत्वाचे आहे. असा नवीन दृष्टीकोण दुर्गाबाई मांडतात.

दुर्गाबाई जेव्हा महाभारतातील व्यक्तिचित्रणाचा मागोवा घेतात तेंव्हा त्यांना असे वाटते, "प्रत्येक व्यक्ती आपली छाप आपल्या साच्यात रूतून बसलेली, खुल्या वातावरणात वावरणाऱ्या जिवंत व्यक्तिऐवजी या रेखिव कटपुतल्या व्यासांनी आळीपाळीने नाचविल्या आहेत."[५] कायमचा अविवाहित राहणारा भी  म, स्वाभिमानी द्रोपदी, कौरवांवर जळणारा भीम, लढणारा अर्जुन, चिंतन करणारा युधि  ठर, दुसऱ्यात स्वत:ला पाहणारा विदुर, व्देष करणारा दुर्योधन, पिळ न सोडणारा कर्ण, खंत करणारी कुमी, व्यवहारिक पटुता असणारे श्रीकृष्ण

© Associated Asia Research Foundation (AARF)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

अशाप्रकारे या व्यक्तिरेखा हट्टी आहेत असे दुर्गाबाईंना वाटते. तसेच महाभारतातुन व्यासांनी सत्व, रज, तम या गुणांचा अविष्कार व्यक्तिचित्रणातून साकार केला आहे. मानव कितीही विकसनशिल असला तरी अंतर्गत संघर्ष त्याला अटळ आहे हे मुख्यत: या लहानमोठ्या रखलनातून पदोपदी दाखवित गेल्या. या अनंत रखलनातून रखनाच्या परिपाकाला त्याने 'दैव' म्हटले आहे."[६] आणि "या दैवाच्या विराट लिलेत मानवी जीवनाचे धागेदोरे कसे गुंफले आहेत हे पावलो पावली कर्मगतीच्या तत्वज्ञानाच्या आधारे दाखविले. कर्ण, दुर्योधन, विदुर, युधिष्ठिर या साऱ्यांच्या तोंडून किंबहुना प्रकृती तुला करायला भाग पाडील हे वदविले आहे."[७] कृष्णाच्याही तोंडून दैव अटळ आहे असे वदविले आहे. यात कर्मपरिपाक आहे, जीवनातील दु:ख आहे, तसेच महाभारत हे ललित आहे याचे कारण सांगून त्या म्हाणतात "भारतीय महाकाव्याच्या धारेप्रमाणे स्थूलमानाने पाहिल्यास ललितकृती आनंदपर्यवसायी असायला हवी परंतु महाभारताने पांडवाच्या स्वर्गगमनाने विराम गाठला आहे. अर्थात सुखपर्यवसनाचा संकेत अधिक कसोटिने लावल्या गेल्यामुळे महाभारत व रामायणही त्या स्थूल नियमांपासून बाजुला सरले तर विस्मय वाटण्याचे कारण नाही आणि तसे पाहिले तर महाभारताचा कर्ता व व्यावहारिक वाचक त्याला ललितकृती म्हणून संबोधित नाहीतच कुणी तेव्हा ज्या माझ्यासारख्यांना ती ललित कृती वाटते."[८]

दुर्गाबाईंना असे वाटते महाभारत हे दैवतकथेतून स्फूरले आहे. कृ णाच्यारूपाने मानवरूपी परमेश्वराचे दर्शन घडविले आहे, आणि दैवतकथेचे प्रतीक कायम राखले आहे. दैवतकथेला अनुरूपी अशी अतिविशाल परिमाणे पात्रांना देण्यात आली आहे; आणि म्हणूनच ती पात्रे आपल्यापैकी असुनही आपल्या जीवनात ती समावत नाही. मानवतेची ओझी मानवतेचे सुखदु:खे तसेच दैवतकथेच्या पात्राप्रमाणे ही पात्रे वाटतात. जीवजंतू मानव यांना घेऊन राहणाऱ्या सनियतीचे भान महाभारतात सतत जाणवते.

दुर्गाबाईंना महाभारतात सुख दु:ख, परस्पर पुरकता, संघर्ष, वैफल्य, पोरूष, कर्ममयता, आवेश, ग्लानी, तत्वज्ञान, सौदर्य, कुरूपता, उदारता कार्वण्य हे सर्व तत्व एकाच कृतीत समाविष्ट झाल्यामुळे दु:खात भरलेले नाट्य व्यासप्रतिभेतून साकार होते आणि मानवी स्वभावाच्या अनंत छटा त्यातून साकारतात, असे व्यासांच्या प्रतिभेच वैशिष्ट्य सांगून व्यासांच्या प्रतिभेची तुलना होमलरशी कारतात आणि ग्रीक महाकाव्या पेक्षा महाभारत श्रेष्ठआहे असे विशद करतात.

महाभारतात कर्ममयता आहे, तसेच श्रध्दा आहे. भौतिक व्यवहाराचा साचा जरासा बदलू न देता नवा आशय त्यामध्ये दिसतो. म्हणून त्याला अंधारातून प्रकाशकडे नेण्याचे सामर्थ्य आहे. या संदर्भात दुर्गाबाई म्हणतात "तमसोमा जोर्तिगमय या अनौपानिबाधिक वचनाचा काव्यमय व प्रत्यक्ष प्रत्ययही आपल्याला महाभारतातुन येऊ शकतो एवढेच नाही तर पांडवांच्या मृत्यनंतर युधिष्ठिर स्वर्गसन्मुख झाल्यावर, कृष्णाला विसरतो, गीताही विसरतो त्या स्वर्गाच्या दाराच्या फटितून नियती तो एक किरण टाकते त्या किरणाला अनुसरून मात्र आपण अनावधानाने असे सहज म्हणत जातो

**© Associated Asia Research Foundation (AARF)**

तजो ऽ सि माये तेजो धेही ।

आणि म्हणून शोकांतिका वाचल्यावर मानवी जीवनाचे सुंदर शिला हेकेखोर दैवाने क्षुद्र मानून विध्वसून टाकल्याचे जे वैफल्य भासत राहते त्याचा अंशही महाभारतात सापडत नाही."[९]

व्यासांची प्रतिभा दुर्गाबाईंना क्रांतिदर्शी वाटते कारण त्यामध्ये चांगल्या गो टी आहे. "मानवाची भौतिक नियती इतर जीवनसृ टीप्रमाणेच आहे परंतु मानवाचे आत्मिक जीवन हे सर्व भौतिक आविष्कारापलिकडील चिन्मय शक्तिशी निगडित आहे हे सर्व दैववादाच्या बुडाशी आहे."[१०]

व्यासप्रतिभेतून जीवनाचे सत्य भासमान होते तिच्यामध्ये गतिमानता आहे कारण व्यासकृती एक विलक्षण चैतन्याने भरलेली आहे. हे चैतन्य एका क्रियेतून भासमान होत, एका ध्येयाकडे जाण्याचा प्रयत्न करते असा समतोल महाभारतात दिसतो. महाभारतात नायक नाही म्हणून ती मुक्त कृती आहे असा उल्लेख दुर्गाबाई करतात.

**व्यासपर्व मधील स्त्री चित्रण**

कामिनी या व्यक्तिचित्रणातून दुर्गाबाईंनी महाभारतातील व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे. इतर पौराणिक स्त्रियांपेक्षा द्रौपदी वेगळी आहे, हे या लेखाच्या प्रारंभी दुर्गाबाई विशद करतात. "प्रीती आणि स्त्री, भक्ती आणि मैत्री, संयम आणि आसक्त या भावनांच्या व्दंव्दातला शुक्ष्म तोल द्रौपदीच्या व्यक्तिमत्वात जसा आढळून येतो तसा अन्य कोणत्याही पौराणिक स्त्रीत मला आढळत नाही."[११] द्रौपदीच्या मनात अनाकलनीय बुध्दिमता आहे त्यात वासनांची उत्कटता आहे तसेच तिच्या मनातून प्रक्षोभता जाणवते असे मत दुर्गाबाई व्यक्त करतात.

महाभारतातील सर्वच नायिका सुंदर आहे; पण याज्ञसेनीचे सौदर्य त्या सर्व नायिकांपेंक्षा कसे वेगळे होते याचा वेध दुर्गाबाई घेतात. द्रौपदीच्या सौदर्याचा घटच वेगळा आहे. रंगही निराळा आहे इतर नायिका गोऱ्या रंगाच्या, कुणी गुलाबी, कुणी कमळासारख्या, कधी पांढऱ्या कमळासारख्या परंतु याज्ञसेनीचे सारेच न्यारे भारतीय शामवर्णी सौदर्याची ती परिसीमा आहे. द्रौपदीचे डोळे कमळाच्या पाकळीसारखे असुन ते मोठे व तेजस्वी आहे, तिचे केस अति कुरळे आणि लांब आहेत. द्रौपदीच्या साऱ्या सौदर्याचे रहस्य तिच्या प्रमाणबध्दतेत आहे ती उंच नाही, ती ठेंगणी नाही, किडकिडित नाही की लठ्ठ नाही.

तेज आणि कोमलता तिच्या अंगप्रत्ययात भरलेली आहे. तिचा प्रत्येय विभ्रम अतिविलोभनीय जो कोणी तिच्याकडे पाहिल तो लुब्ध झाला नाही असे व्हायचेच नाही. द्रौपदी विषयी सुदेष्णेने उद्गार काढले ते उल्लेखनीय आहेत. सुदेष्णा म्हणाली "बाई ग तुला माझ्या घरात दासी म्हणून कशी ठेवून घेऊ? तुझ्या सारखे पराका टेच मोहक लावण्य मी अजून कुठेही पाहिले नाही. तुला पाहून स्त्रियाही मोहित होतात तिथे पुरूषांची कळा काय? तु जर माझ्या नवऱ्याच्या दृष्टिस पडलिस तर माझे इथले राणीपण संपलेच तू चालू लाग

कशी?"[१२] या उदाहरणातून दुर्गाबाई असे सूचित करतात द्रौपदीला बघून पुरूषच काय पण स्त्रियाही मोहित होता. इतके आकर्षन तिच्या सौदर्याचे आहे.

द्रौपदीचे जीवन हे संघर्षमय आहे. तिच्या जीवनात स्पर्धा आहे, तसेच भावाभावांनी एकोपा मोडू नये म्हणून द्रौपदी वाटून घेतली. जयद्रथ, किचक द्रौपदी मिळावी म्हणून स्पर्धा करताना दिसतात; परंतु ही स्पर्धा द्रौपदीच्या जीवनातील केंद्रबिंदू झाला नाही. या संदर्भात दुर्गाबाई म्हणतात,"सभेतील द्रौपदीच्या विटंबनेने स्वयंवराच्या प्रसंगापासून तो राजसूर्य यज्ञापर्यंत स्पर्धा कायम ठेवली आणि नंतर तिला राजस्वला असताना आणून या स्पर्धेच्या नाट्याला अनाट्याचे स्वरूप आणले. जयद्रथ, किचक नसते तर हे उपनाट्य निरस झाले असते. कृष्ण नसता तर स्पर्धेतील स्पृदेचे कमनीय रूप प्रकट झाले नसते."[१३]

व्यासांनी द्रौपदीला तरूण दाखविली आहे. मुळात द्रौपदीच्या स्वभावाचे व्यक्तिमत्व दुर्गाबाईंना जाणवते ते असे की, आपण पुरूषावर छाप मारू शकतो. कुणाला दूर सारावे, कुणाला जवळ घ्यावे हे तिला माहित आहे. ती कुणाला नकार देते आणि ब्राम्हण वेशातील अर्जुनासोबत झोपडीत जाते, पाच पती सोबत विवाह करते.

कृष्ण आणि द्रौपदी या नात्याचा शोध दुर्गाबाई घेतात. त्यांच्या मैत्रिचे स्वरूप विविध प्रसंगातून व्यक्त करतात. कुणाशीही न बोलणारी कृष्णाची मैत्रिण असते. परंतु ही मैत्री अशाब्दीक आहे. द्रौपदी वस्त्र हरण प्रसंगी कृष्ण द्रौपदीला गुप्तरूपात येऊन वस्त्र पुरवितात. कृष्णाजवळ ती दु:ख व्यक्त करते. कृष्ण आणि द्रौपदी यांची मैत्री भक्त आणि परमेश्वराची आहे.

युधिष्ठिराचे शांत राहणे तिला आवडत नाही. द्रौपदीचे जयद्रथने हरण केले, त्यानंतर द्रौपदीला पाच पांडव सोडवून आणतात. युधिष्ठिर जयद्रथला दु:शलेचा पती म्हणून सोडून देतो ही गोष्ट द्रौपदीला आवडत नाही. विराट पर्वात तर ती उघड म्हणते "जिला युधिष्ठिर हा नवरा मिळाला तिला सुख कुठचे."[१४] किचक मेल्यावर बृहन्नडारूपी अर्जुन किचकाला मारण्याचे कारण विचारतो तेंव्हाही ती त्याला फटकारून म्हणते "बृहन्नले तुझे सैरंध्रीशी काय काम आहे, आता? तू त अत:पुरात सुखात बसली आहेस सैरंध्रीला दु:ख आहे ते तुला नाही."[१५] अशा प्रकारे द्रौपदीच्या बुध्दिमतेचे लहान लहान प्रसंग व्यासप्रतिभेतून साकार झाले आहेत असे दुर्गाबाईंना वाटते. कृष्णकथेतून श्रीकृष्णकथेच्या आधारे जनमानसावर तिचा प्रभाव पडतो अशा प्रकारे दुर्गाबाई भागवतांना द्रौपदीचे चित्रण केले आहे.

**समारोप**

'व्यासपर्व' या लेखसंग्रहातून दुर्गाबाई भागवतांनी महाभारतातील व्यक्तिरेखांचा आढावा घेतला आहे. बदलत्या जीवनजाणिवांचा शोध घेतला आहे. महाभारतात अनेक पर्व आले आहे परंतु दुर्गाबाई भागवतांनी व्यास

प्रतिभेच्या आवि  काराला व्यासपर्व म्हटले आहे. महाभारतामध्ये अनेक गोष्टी आल्या आहेत अनेक अभ्यासकांनी महाभारतातून विषय घेऊन नवीन कलाकृती निर्माण केल्या आहेत. प्रत्येक व्यक्तिरेखा ही वेगळी आहे. त्याचे वैशिष्ट्य वेगळे आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेमध्ये एक नवीन नाट्य व्यासांनी दाखविले आहे. तर व्यासप्रतिभा दुर्गाबाईंना क्रांतीदर्शी वाटते. महाभारतात नायक नाही म्हणून दुर्गाबाईंना ही कलाकृती मुक्त कृती वाटते. महाभारतात कृष्णाच्या व्यक्तिरेखेतून व्यासांनी मानवरूपी परमेश्वराचे दर्शन घडविले आहे. मानवी स्वभावाच्या अनंत छटा महाभारतात आहे असेही त्या म्हणतात. तसेच 'कामिनी' या व्यक्तिचित्रणातून त्यांनी द्रौपदीची व्यक्तिरेखा साकारली आहे. द्रौपदीच्या सौंदर्याचे वर्णन केले आहे, तिच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. द्रौपदीच्या व्यक्तिरेखेचे लहानसहान पैलू दाखविले आहे.तसेच 'व्यासपर्व' मधून दुर्गाबाई भागवतांनी प्रत्येक व्यक्तिरेखांचे वर्णन करताना त्याचे वेगळेपण व्यासप्रतिभेतून कसे साकार होते हे दाखवून महाभारताचा नवा अन्वयार्थ स्पष्ट केला आहे. महाभारत हे श्रेष्ठ महाकाव्य आहे अशी भूमिका त्यांनी मांडली आहे या अर्थाने दुर्गाबाई भागवतांच्या 'व्यासपर्व' चे वेगळेपण सिध्द होते.

**निष्कर्ष**

१. दुर्गाबाई भागवत यांनी व्यासपर्व मधून बदलत्या जीवन जाणिवांचा संदर्भ घेऊन व्यक्तिरेखांचा विचार केला आहे.
२. महाभारतात आदिपर्व, सभापर्व, उद्योगपर्व, भिष्मपर्व, वनपर्व, अनुशासनपर्व असे अनेक पर्व आहेत परंतु दुर्गाबाई व्याप्रतिभेच्या आवि  काराला व्यासपर्व म्हटले आहे.
३. दुर्गाबाई महाभारतातील व्यक्तिरेखांशी संवाद साधतात.
४. महाभारतातील सौंदर्याचा साक्षात्कार नाट्यपूर्ण रितीने व्हावा असे दुर्गाबाईंना वाटते.
५. माहाभारताला दुर्गाबाईनी ललित कलाकृती मानले आहे कारण त्यात सुख, दुःख, परस्परपुरकता, संघर्ष, वैफल्य, पौरूष, कर्ममयता, आवेश, ग्लानी, तत्वज्ञान व सौंदर्य आहे.
६. कृ  णाला दुर्गाबाईंनी मानवरूपी परमात्मा म्हटले आहे, दैवत कथांची परिमाणे महाभारतातून जाणवतात असे दुर्गाबाईंना वाटते.
७. दुर्गाबाई व्यासांच्या प्रतिभेची तुलना होमलरशी करतात आणि ग्रीक महाकाव्यापेंक्षा महाभारताला श्रेष्ठ मानतात.
८. व्यासकृती चैतन्याने भरली आहे हे चैतन्य एका बीजाकडून व्यक्तिकडे जाते आणि व्यक्तिच्या क्रियेतून भासमान होते.
९. द्रौपदीला दुर्गाबाई कामिनी म्हणतात, दुर्गाबाई इतर पौराणिक स्त्रियांपेक्षा द्रौपदीला वेगळे मानतात.
१०.दुर्गाबाईंना द्रौपदीचे सौंदर्य इतर नायिकांपेक्षा वेगळे वाटते उर्वरित सर्व नायिका गोऱ्या आहेत परंतु द्रौपदी शामवर्णी सौंदर्याची परिसीमा आहे असे वाटते.

**संदर्भ टिपा**

१. शकुंतला भावे – 'वेध दुर्गा भागवतांच्या साहित्याचा' शिवम प्रकाशन पुणे २००५ पृ.क्र. ४१
२. तत्रैव पृ.क्र. ४३
३. दुर्गा भागवत – 'व्यासपर्व' मौज प्रकाशन गृह, मुंबई, अकरावी आवृत्ती, २००६ पृ.क्र. ०३
४. तत्रैव पृ.क्र. ०३
५. तत्रैव पृ.क्र. ०६
६. तत्रैव पृ.क्र. ११
७. तत्रैव पृ.क्र. ११
८. तत्रैव पृ.क्र. १२
९. तत्रैव पृ.क्र. १४
१०. तत्रैव पृ.क्र. १४
११. तत्रैव पृ.क्र. ११९
१२. तत्रैव पृ.क्र. १२१
१३. तत्रैव पृ.क्र. १२१
१४. तत्रैव पृ.क्र. १३१
१५. तत्रैव पृ.क्र. १३३

**संदर्भ ग्रंथसूची**


१. आठवले अ. दा.– 'महाभारत एका भाऊबंदानो तुमची कहाणी' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९८
२. आठवले अ. दा.– महाभारताचे वास्तव दर्शन , आक्षेपाच्या संदर्भात, कॉन्टिनेंटल बुक साहित्य, पुणे, १९७०
३. कंटक प्रेमा – 'महाभारत एक मुक्त चिंतन' महारा ट्र ग्रंथ भंडार, कोल्हापूर १९६७
४. कानिटकर वि. ग. – 'महाभारत पहिला इतिहास', रविराज प्रकाशन, पुणे १९९०
५. दुर्गा भागवत – 'व्यासपर्व' मौज प्रकाशन गृह, मुंबई, अकरावी आवृत्ती, २००६
६. भावे शकुंतला – 'वेध दुर्गा भागवतांच्या साहित्याचा' शिवम प्रकाशन पुणे २००५